मिरा भाईंदर महानगरपालिका
निवडणुक विभाग
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, ४०१ १०१. दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/नि.वि./७८४/२०२५-२६ दिनांक:- २७/११/२०२५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सार्वत्रिक निवडणूक-२०२५

## प्रारूप मतदार यादी सुधारीत जाहिर सूचना

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक:रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि. २६ नोव्हेंबर, २०२५ नुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविणेकरिता सुधारीत वेळापत्रक प्राप्त झाले आहे. त्यानुसार प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादीवर दि. ०३/१२/२०२५ पर्यंत हरकती व सूचना मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पहिला मजला, कर विभाग, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) येथे कार्यालयीन वेळेत दाखल करता येतील.

| अ.क्रं. | निवडणुकीचा टप्पा | दि. १३/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ | दि. ०३/१२/२०२५ |
| २ | प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करणे. | दि. ०४/१२/२०२५ | दि. १०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे. | दि. ०८/१२/२०२५ | दि. १५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. १२/१२/२०२५ | दि. २२/१२/२०२५ |

टिप : (१) ऑनलाईन अथवा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-मेल वर प्राप्त हरकती व सूचना ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.
(२) क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयातच हरकती व सूचना दाखल करण्यात याव्यात. या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी दाखल केलेल्या हरकती व सूचना ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका